ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ८ जानेवारी, १९५८ | अंक १

## विविध माहिती

**तामीळ अधिकृत भाषा**—मद्रास राज्य सरकारनें ता. १४ जानेवारीपासून तामीळ ही भाषा सरकारी पत्रव्यवहारांत वापरण्याचें ठरविलें आहे. त्या तारखेपासून राज्यांतील सुमारें १,७५० सरकारी कचेऱ्या तामीळचा वापर करूं लागतील. त्याचप्रमाणें, तामीळ भाषेंतील टंकलेखक यंत्र प्रमाणित करण्याचे प्रयत्नहि करण्यांत येणार आहेत. टंकलेखक यंत्रांतील अक्षरांच्या ठशांची सुधारणाहि करण्यांत येणार आहे.

**भारतामधून सायकलींची निर्यात**—भारतांत तयार करण्यांत आलेल्या दोन लाख सायकली सौदी अरेबिआ आणि सूदानमध्यें निर्यात करण्यांत आल्या. भारतांत तयार झालेल्या सायकली निर्यात करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. १९५८ सालींहि दोन लाख सायकली निर्यात करण्यांत यावयाच्या आहेत. ब्रह्मदेश, सीलोन, इंडोनेशिआ, इत्यादि देशांना त्या पाठविण्यांत येतील.

**भोपाळचा पाणीपुरवठा**— भोपाळ म्युनिसिपालिटीनें शहराला शुद्ध केलेलें पाणी पुरविणारी योजना चालू केली आहे. ह्या योजनेसाठी ५ लाख रुपये खर्च करण्यांत आले आहेत. शहराला पिण्याचें स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी आतां तीन यंत्रांची सोय झाली आहे. शहराला रोज ४७ लाख गॅलनचा पाणीपुरवठा आतां होऊं शकेल.

**रुमेनिआला जाणारे विद्यार्थी**—रुमेनिआंत जाऊन तेलाचा शोध लावण्याच्या तंत्राचें शिक्षण घेण्यासाठी भारत सरकारचें शिक्षणखातें लवकरच १० विद्यार्थ्यांना तिकडे पाठविणार आहे. रुमेनिआच्या सरकारनें भारतीय विद्यार्थ्यांसाठी ३० शिष्यवृत्त्या देऊं केलेल्या आहेत. ह्या शिष्यवृत्त्यांचा फायदा घेऊनच वरील विद्यार्थी अभ्यास करणार आहेत.

**कॅन्सरविषयक संशोधन संस्था**—म्हैसूरचे मुख्य मंत्री श्री. निजलिंगाप्पा ह्यांनीं बंगलोर येथें कॅन्सरविषयक संशोधन करणाऱ्या संस्थेचा पायाभरणी समारंभ साजरा केला. ही संस्था भारताचे मरहूम अन्नमंत्री, श्री. रफी अहंमद किडवाई ह्यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ उभारण्यांत येत आहे. राज्य सरकार व बंगलोरचें कॉर्पोरेशन ह्यांनीं त्याच्या उभारणींत भाग घेतला आहे.

**राजस्तानमध्यें मँगेनीझच्या खाणी**—भारताच्या भूगर्भविषयक पहाणीच्या खात्यानें केलेल्या तपासणींत असें आढळून आलें आहे कीं, राजस्तानच्या उदयपूर व बनासवाडा भागांत २,५०,००० टन अशुद्ध मँगेनीझचा सांठा आहे. ह्या धातूच्या खाणी जमिनीपासून अवघ्या तीस ते चाळीस फुटांवरच लागतील, असाहि अंदाज करण्यांत आला आहे. भारतांत मुख्यतः मध्यप्रदेशांत ह्या धातूच्या खाणी आहेत.

**अशुद्ध लोखंडाची खरेदी**—पोलंडनें भारतापासून अशुद्ध लोखंड विकत घेण्याचा करार केला आहे. करारांत ठरल्याप्रमाणें भारत पोलंडला ४,५०,००० टन अशुद्ध लोखंड निर्यात करणार आहे. त्याची किंमत सुमारें २½ कोटी रुपये होईल. पोलंडप्रमाणेंच युगोस्लाव्हिआहि भारताकडून सुमारें ३,००,००० टन अशुद्ध लोखंड घेण्याचा करार करणार आहे.

**हौशी प्रवाशांची सोय**—अहमदाबाद शहरांतील प्रेक्षणीय स्थळें हौशी प्रवाशांना दाखविण्यासाठी कॉर्पोरेशनच्या बस सर्व्हिसनें खास सोय केली आहे. अशा प्रवाशांसाठी शहराच्या आसमंतांत सुमारें ४० मैलांचा फेरफटका मारणारी व सुखद हवामान राखणारी एक खास बस तयार करण्यांत येणार आहे.

**हैड्रोजनच्या शक्तीवर नियंत्रण**—सोव्हिएट पदार्थविज्ञानशास्त्रज्ञांनीं प्रयोगशाळेंत १० लाख अंश तपमान उत्पन्न करून हैड्रोजन बाँबच्या स्फोटक शक्तीवर ताबा मिळविला असल्याची वार्ता आहे. ब्रिटिश शास्त्रज्ञांनींहि ह्या कामीं यश मिळविल्याचें समजतें. एकंदरीनें, जगांतील प्रमुख राष्ट्रें ह्या स्फोटाचा औद्योगिक कामासाठी उपयोग करून घेण्याच्या कामीं चांगली प्रगति करीत आहेत.

**स्वस्त रेडिओ पाहिजेत**—माहिती व नभोवाणी खात्याचे चिटणीस श्री. रामदयाळ ह्यांनीं नभोवाणीचा उपयोग अधिक लोकांना करतां यावा म्हणून स्वस्त रेडिओ सेट्स निर्माण करण्याची अवश्यकता प्रतिपादन केली आहे. पश्चिम बंगालमध्यें रेडिओसाठी १½ लाख परवाने काढण्यांत येतात. पण त्यांपैकी ८२,५०० परवाने एकट्या कलकत्त्यांत काढण्यांत येतात, अशी माहिती त्यांनीं सांगितली.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

**भारतीय शास्त्रज्ञ परदेशीं रवाना**—कलकत्ता विद्यापीठांतील पदार्थविज्ञानशास्त्राचे रीडर डॉ. कमळाक्ष दासगुप्ता फुलब्राइट प्रवासी मदत मिळवून अमेरिकेला रवाना झाले आहेत. ते ओहिओ विद्यापीठांत अणुशक्तीसंबंधीं संशोधन करणार आहेत. डॉ. गुप्ता ह्यापूर्वी संशोधनकार्यासाठीं कांहीं युरोपीय देशांत जाऊन आलेले आहेत.

**अमेरिकेची लोकसंख्या**—१९५७ च्या प्रारंभीं अमेरिकेची जेवढी लोकसंख्या होती, तिच्याशीं तुलना करतां १९५८ च्या आरंभींची लोकसंख्या ३० लाखांनीं जास्त आहे. १९५८ च्या प्रारंभीं अमेरिकेची लोकसंख्या १७ कोटी, २८ लाख होती. पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या सुमारें १५ लाखांनीं अधिक आहे. दर अकरा सेकंदाला एक नवा जीव जन्माला येत आहे.

**इंडोनेशिआची शस्त्रांची खरेदी**—इंडोनेशिआच्या सरकारनें अंतर्गत शांतता राखण्यासाठीं जरूर असणाऱ्या शस्त्रांसाठीं अमेरिकेशीं वाटाघाटी चालविल्या होत्या. त्या अयशस्वी झाल्यामुळें आतां युरोपांतील देशांकडून जरूर तीं शस्त्रें घेण्याचा विचार करण्यांत येत आहे. इंडोनेशिआच्या लष्करी प्रतिनिधींचें एक मंडळ त्यासाठीं पोलंड, झेकोस्लोव्हाकिआ व युगोस्लाव्हिआच्या दौऱ्यावर निघालें आहे.

**सीलोनमधील मोटारवाहतूक**—१९५८ च्या आरंभापासून सीलोनच्या मोटारवाहतुकीचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें. राष्ट्रीयीकरण अमलांत आल्यामुळें ७७ बस-कंपन्यांना वेगवेगळया मार्गांवर वहातूक करण्यासाठीं देण्यांत आलेले परवाने रद्द झाले आहेत. त्यांच्या ३,३०० बसेस आणि इतर सर्व मालमत्ता सीलोन गव्हर्नमेंट ट्रॅन्सपोर्ट बोर्डाच्या मालकीची झाली आहे.

**पूरग्रस्तांना मदत**—सीलोनमधील पुराच्या संकटांत सांपडलेल्या लोकांना मदत करण्यासाठीं भारतानें कांहीं विमानें पाठविलीं होतीं. ह्या विमानांनीं पूरग्रस्त प्रदेशांवर भ्रमण करून ९०,००० पौंड वजनाची अन्नसामुग्री व औषधें गरजू लोकांसाठीं खालीं टाकलीं. मदतीला पाठविण्यांत आलेल्या विमानांत दोन हेलिकॉप्टर्स आहेत.

**अमेरिकन तंत्रज्ञांची मदत**—अविकसित देशांचा औद्योगिक विकास साधण्यासाठीं अमेरिकेकडून पैशाची व तंत्रज्ञांची मदत मिळत असते. पण चालू वर्षांत अमेरिकेकडून परदेशी मदतीसाठीं पाठविण्यांत येणाऱ्या तंत्रज्ञांच्या संख्येंत कपात करण्यांत येणार असल्याची वार्ता आहे. संबंधित देशांना तसें कळविण्यांतहि आलें आहे.

**विजेच्या कारखान्याची सामुग्री**— भोपाळ येथें काढण्यांत येणाऱ्या, विजेची भारी यंत्रसामुग्री निर्माण करणाऱ्या कारखान्यास लागणारी यंत्रसामुग्री आणण्याच्या कामीं परदेशीय हुंडणावळीची टंचाई भासत होती. पण, असोसिएटेड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज ह्या ब्रिटिश कारखान्यानें किंमत उशिरा घेण्यास संमति दिली आहे. भारत सरकार व ब्रिटिश कारखाना ह्यांच्यांत तसा करारहि झाला आहे.

**शास्त्रीय विषयांच्या शिक्षणांत सुधारणा**—अमेरिकेंतील शाळांमधून शास्त्रीय विषय शिकविण्याच्या सध्यांच्या ज्या पद्धति आहेत त्यांत सुधारणा करण्यासाठीं प्रे. आयसेन होअर अमेरिकन कॉंग्रेसकडे ५ कोटी डॉलर्सची मागणी करणार आहेत. रशिआच्या शास्त्रीय प्रगतीमुळें अमेरिकेंत जी प्रतिक्रिया झाली तिचा हा परिणाम असावा असें म्हणतात.

## माजी सरसेनापती श्री. करिअप्पा ह्यांची पु. सें. को. बँकेस भेट

भारताचे माजी सरसेनापति श्री. के. एम्. करिअप्पा यांनीं पुणें सेंट्रल को-ऑप. बँकेस दिनांक २-१-५८ रोजीं अनौपचारिक भेट दिली.

संचालक मंडळाचे सभासद श्री. वि. ज. करंदीकर यांनीं श्री. करिअप्पा यांची ओळख करून देऊन बँकेविषयीं माहिती दिली.

श्री. करिअप्पा यांनीं बँकेचे कामकाजासंबंधीं अत्यंत उत्सुकतेनें माहिती घेतली. उत्तरादाखल श्री. करिअप्पा म्हणाले कीं, शेतीव्यवसायासाठीं कर्जाचा पुरवठा करणें हें बँकेचें महत्त्वाचें कार्य आहे. तथापि तें करतांना प्रत्यक्ष शेतकऱ्यास त्यांची पत व मिळकत वाढविण्यासाठीं कशी मदत होते याचा बारकाईनें अभ्यास करणें अत्यंत महत्त्वाचें आहे. कर्ज दिल्यानंतर त्याच्या परिणामासंबंधींची माहिती उपलब्ध करून घेणें जरूरीचें आहे. शेतकरी वर्गामध्यें सहकारी कार्यपद्धतीच्या फायद्यांचा प्रसार व प्रचार करण्यासाठीं केवळ भाषणें करून प्रचार न करितां निरनिराळया तऱ्हेच्या सहकारी संस्था व त्यांची कार्यपद्धति यांचेबद्दलच्या माहितीचे बोधपट खेडोंपाडीं दाखविल्यानें प्रचार जास्त चांगला होईल. तरी बँकेच्या संचालकांनीं या सूचनेचा अवश्य विचार करावा, अशी विनंती त्यांनीं केली.

श्री. वा. व. गोगटे यांनीं आभार मानल्यावर समारंभाचे शेवटीं बँकेचे अध्यक्ष मा. दादासाहेब सावंत इनामदार यांनीं संचालक मंडळाचे वतीनें पाहुण्यांना हार व गुच्छ अर्पण केला.

---

## दक्षिण भारतांतील चित्रपटव्यवसायाची भरभराट

### १०९ चित्रपट; प्रमुख नऊ नट-नटींचें ७०% चित्रपटांत काम !

१९५७ हें साल दक्षिण भारतांतील चित्रपटव्यवसायास चांगलें गेलें. ह्या पूर्वींच्या कोणत्याहि वर्षापेक्षा ह्या वर्षी अधिक चित्रपटांना सेन्सॉरची सर्टिफिकिटें मिळालीं. १९५६ मध्यें १०१ तर १९५७ मध्यें १०९ चित्रपट सेन्सॉर झाले. तामीळ चित्रपटांची संख्या घटली, पण तेलुगू, मल्याळी व हिंदी चित्रपटांची संख्या वाढली. कानडी चित्रपटांची संख्या कायम राहिली. हे १०९ चित्रपट ९० कथांवर काढण्यांत आले; म्हणजे, एकापेक्षा अधिक भाषांचा चित्रपटावर संस्कार करण्याची प्रथा अजून चालू आहे. सेन्सॉर झालेल्या चित्रपटांची एकूण लांबी १७ लक्ष फूट भरली. गेल्या वर्षी ती १५ लक्ष फूट होती. प्रत्येक चित्रपटाची सरासरी लांबी १६,००० फूट होती. (तामीळ १६,६५० फूट, तेलुगू: १६,००० फूट, मल्याळी: १५,६५० फूट, कानडी: १५,५५० फूट, हिंदी: १४,२५० फूट). मद्रास शहरांत सतरा, सालेममध्यें दोन, कोइमतूरमध्यें एक, त्रिवेंद्रममध्यें दोन आणि म्हैसूरमध्यें एक, अशी स्टुडिओंची संख्या आहे. हैद्राबाद येथें एक स्टुडिओ तयार होत आहे. ह्या सर्वांत मिळून एकाच वेळीं ६० जागीं फिल्म घेतां येण्याची सोय आहे. दक्षिण भारतांतील ९०% चित्रपट मद्रास येथेंच तयार होतात. नऊ नट-नटींनीं मिळून ७५ चित्रपटांत (२४ तामीळ, २८ तेलुगू, १ कानडी, २ हिंदी) काम केलें. एकट्या मद्रास राज्यांत स्थायी व फिरती अशीं ९०० सिनेमागृहें आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. ८ जानेवारी, १९५८



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताची परदेशीय येण्या–देण्याची परिस्थिति

रिझर्व्ह बँकेनें भारताच्या परदेशी देण्या–घेण्याचा १९५५ अखेरचा आढावा घेतला, त्याचा अहवाल आतां प्रसिद्ध करण्यांत आला आहे. १९५५ अखेर भारताचें एकूण देणें ७६६·३ कोटी रु. व येणें १२५१·८ कोटी रु. होतें. म्हणजे, देण्यापेक्षा येणें ४८५·५ कोटी रुपयांनीं अधिक होतें. ग्रेटब्रिटनकडून भारताला निव्वळ ४०८·५ कोटी रु. येणें होतें, तर पाकिस्तान भारताला २६९·५ कोटी रुपये देणें लागत होता. भारत अमेरिकाचा १०४·७ कोटी रुपयांचा ऋणको होता.

३० जून, १९४८ ते ३१ डिसेंबर, १९५५ ह्या मुदतींत भारताच्या निव्वळ येण्यांत १०१९ कोटी रुपयांची घट झाली. त्याचें कारण, येणें ७५७ कोटी रुपयांनीं कमी झालें व २६२ कोटी रुपयांनीं देणें वाढलें.

१९५५ अखेरच्या येण्या–देण्याच्या हिशेबांत भारत हा धनको दिसत असला, तरी १९५७ अखेर तो ऋणको बनलेला आढळून येईल. कारण, ग्रेटब्रिटनमधील स्टर्लिंग येणें बऱ्याच रकमेनें कमी झालें असून अमेरिकेला द्यावयाच्या रकमेंत मोठी भर पडत आहे. जागतिक चलननिधि व जागतिक बँक ह्यांचेकडील देणेंहि वाढत आहे.

१९५५ अखेर भारताच्या परराष्ट्रीय येण्या–देण्यांत जो वाढावा दिसत होता, त्याचें श्रेय सरकारी विभागांतील ९६०·८ कोटी रुपये येण्यासच दिलें पाहिजे; खाजगी विभाग ४७५·३ कोटी रुपयांचा देणेकरीच होता. ३० जून, १९४८ ते ३१ डिसेंबर, १९५५ ह्या मुदतींत परराष्ट्रीय येण्यांत मोठी घट झाली, त्यालाहि सरकारी विभागच मुख्यत्वेंकरून कारणीभूत होता; ह्या विभागांतील येणें ७६९ कोटी रुपयांनीं कमी होऊन देणें ३२ कोटी रुपयांनीं वाढलें. खाजगी विभागाचें देणें २१८ कोटी रुपयांनीं वाढलें, तर येण्यांत २३० कोटी रुपयांची भर पडून अखेर येणें १२ कोटी रुपयांनीं सुधारलें.

भारतांतील परकीयांच्या गुंतवणीची किंमत १९५५ अखेर ४८१ कोटी रु. होती. त्यांत कारखानदारीचा वाटा १६३ कोटी रुपये, व्यापाराचा १०२ कोटी रुपये, मळ्यांचा ८७ कोटी रुपये, वीजपुरवठा व वहातूक ह्यांचा ५३ कोटी रुपये आणि इतर उद्योगधंद्यांचा ७१ कोटी रुपये होता. वरील एकूण रकमेंत पेट्रोलिअमविषयक उद्योगधंद्यांतील १०४ कोटी रुपयांचाहि समावेश होतो. (७६ कोटी व्यापारांत व २८ कोटी रुपये कारखानदारींत).

शाखा, दुय्यम कंपन्या व विदेशीयांच्या नियंत्रणाखालील इतर उपक्रम ह्यांत ४११·३ कोटी रुपये गुंतलेले होते. विदेशीयांच्या एकूण गुंतवणुकीशीं ह्या गुंतवणुकीचें प्रमाण ८५% पडतें. ज्या विदेशी गुंतवणुकींत विदेशीयांचें नियंत्रण नाहीं, अशांची रक्कम ६९·४ कोटी रुपये होती.

भारतांत गुंतवणूक असणाऱ्या देशांपैकी एकट्या ग्रेट ब्रिटनचीच गुंतवणूक ३०२ कोटी रु. ची आहे. अमेरिकेनें ४१ कोटी रु. गुंतवलेले आहेत; बाकी सर्व देशांची बेरीज ४८ कोटी रुपये होते.

जुलै, १९४८ ते डिसेंबर १९५५ ह्या मुदतींत विदेशीयांची भारतांतील गुंतवणूक निव्वळ १६० कोटी रुपयांनीं वाढली. बँकांतील गुंतवणूक १० कोटी रुपयांनीं कमी झाली; म्हणजे बाकीच्या क्षेत्रांतील गुंतवणुकींत १७० कोटी रुपयांची भर पडली. त्यांपैकी १३५ कोटी रुपये जुलै, १९४८ ते डिसेंबर १९५३ ह्या मुदतींत गुंतविण्यांत आले होते, तर ३५ कोटी रुपये १९५४ व १९५५ मध्यें गुंतविले गेले. नव्या गुंतवणुकीपैकी पेट्रोलिअमविषयक गुंतवणुकीचा वांटा ८० कोटी रुपयांचा आहे; इतर प्रकारच्या कारखान्यांना परदेशांतून ६० कोटी रुपये मिळाले.

## कंपनी कायद्यांत कमिटीनें सुचविलेल्या दुरुस्त्या

१९५६ च्या कंपनी कायद्यांत सुधारणा सुचविण्यासाठी भारत सरकारनें मे, १९५७ मध्यें मद्रास हायकोर्टाचे सेवानिवृत्त जज्ज श्री. विश्वनाथ शास्त्री ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली होती. कमिटीनें केलेल्या शिफारसींपैकी महत्त्वाच्या शिफारसी अशा आहेत. मॅनेजिंग डायरेक्टरची सध्यांची व्याख्या फार व्यापक आहे, ती मर्यादित करावी अशी कमिटीची सूचना आहे. मॅनेजिंग डायरेक्टर हा मॅनेजर किंवा मॅनेजिंग एजंट ह्यांच्या समान समजला जावा. ज्याला कंपनीच्या सबंद व्यवहाराचा ताबा नाहीं, तो मॅनेजिंग डायरेक्टर समजला जाऊं नये, असा त्यांत उद्देश आहे.

ज्या प्रायव्हेट कंपनींत वसूल भांडवलापैकी २५% किंवा त्यापेक्षा ज्यास्त भांडवल पब्लिक किंवा प्रायव्हेट कंपन्या धारण करीत असतील, त्या प्रायव्हेट कंपनीस पब्लिक कंपनी मानलें जावें, अशी कमिटीची दुसरी सूचना आहे. नातेवाइकाची व्याख्याहि मर्यादित करण्यांत आली आहे. कंपनीनें डिव्हिडंड जाहीर करण्यापूर्वी इन्कमटॅक्स कायद्याप्रमाणें घसाऱ्याची तरतूद केलेली असली पाहिजे. डिव्हिडंड जाहीर केल्यावर सात दिवसांचे आंत डिव्हिडंडची रक्कम शेड्यूल्ड बँकेंत ठेवण्यांत आली पाहिजे.

कंपनीचें आर्थिक वर्ष संपल्यानंतर परंतु रिपोर्टाचे तारखेचे पूर्वी ज्या महत्त्वाच्या आर्थिक घटना घडतील, त्यांची माहिती डायरेक्टरांच्या रिपोर्टांत देण्यांत आली पाहिजे. प्रायव्हेट कंपनीचें नफा–तोटा पत्रक पब्लिक कंपन्यांप्रमाणेंच रजिस्ट्रारकडे नोंदविण्यांत आलें पाहिजे; परंतु बिगर–सभासदांना तें पत्रक पहाण्यास उपलब्ध रहाणार नाहीं. शाखांच्या हिशेबांची तपासणी पात्रता असलेल्याकडून करवून घेतली पाहिजे; कायद्याप्रमाणें नेमलेल्या हिशेबतपासनिसाला ते हिशेब तपासण्याचा अधिकार असावा, पण त्याचेवर सक्ति नसावी. कांहीं विशिष्ट प्रकारच्या कंपन्यांचे बाबतींत, डायरेक्टरांची सभा तिमाहींत झालीच पाहिजे, हा नियम सरकार सैल करूं शकेल; बोर्डाच्या सभेस दोघांचा

( हितसंबंध नसलेल्यांचा ) कोरम पुरा होईल. बँकेनें स्वीकारलेल्या ठेवी ह्या २९२ ह्या कलमांतील "कर्जें" ह्या सदरांतून काढून टाकण्यांत याव्यात, अशीहि कमिटीची शिफारस आहे. सध्यांच्या तरतुदीप्रमाणें, एखाद्या डायरेक्टराचा नातेवाईक कंपनींत नोकर असेल तर डायरेक्टराला आपली जागा सोडावी लागते. डायरेक्टराच्या गैरमाहितीनें असा नोकर नेमला गेला असेल, तर नेमणुकीनंतर तीन महिन्यांत कंपनीची मंजुरी घ्यावी; नाहींतर डायरेक्टर आपली जागा खाली करील व त्याला मिळालेली फी वगैरे परत करील.

नफातोटा-पत्रकाला खालील तपशील जोडावा लागेल. (१) मॅनेजिंग एजंट, मॅनेजिंग डायरेक्टर, डायरेक्टर, ह्यांस दिलेलें वेतन, फी, वगैरे. (२) मॅनेजिंग एजंटसच्या खर्चाची केलेली भरपाई. (३) मॅनेजिंग एजंटस व संबंधी लोक ह्यांना दिलेलें वेगळें कमिशन. (४) खरेदीबद्दल व विक्रीबद्दल त्यांना दिलेलें कमिशन. (५) त्यांचेशीं केलेल्या कराराविषयीं तपशील.

## भारताची आकडेवारीनें काढलेली रूपरेषा

### टाटा इंडस्ट्रीजचें उपयुक्त प्रकाशन

टाटा इंडस्ट्रीज प्रायव्हेट लि. नें "स्टॅटिस्टिकल आउटलाइन ऑफ इंडिया १९५७" ह्या नांवाचें खिशांतील डायरीच्या आकाराचें एक छोटेंसें पुस्तक आकर्षक रीतीनें छापून व बांधून प्रसिद्ध केलें आहे. ज्यांना भारताविषयीं महत्त्वाचे आकडे अगदीं तयार ठेवावे लागतात, अशांच्या उपयोगासाठी हें पुस्तक मुख्यतः तयार करण्यांत आलेलें आहे. पुस्तकांतील सर्व आकडे सरकारी प्रकाशनांतून घेण्यांत आलेले आहेत. राष्ट्रीय उत्पन्न, लोकसंख्या, राष्ट्रीय साधनसंपत्ति, औद्योगिक कामगार, परदेशी व्यापार, जॉइंट स्टॉक कंपन्या, बँकिंग, विमा व सहकार, सरकारी उत्पन्न-खर्च, पंचवार्षिक योजना, किंमती, इत्यादि प्रकरणांत माहिती विभागलेली असून शेवटीं उपयुक्त सूची देण्यांत आली आहे. टाटा इंडस्ट्रीजच्या अर्थशास्त्र व आकडेशास्त्रविषयक शाखेनें हें पुस्तक तयार करण्यांत दाखविलेलें कौशल्य, नीटनेटकेपणा, औचित्य, रचना, हीं वाखाणण्यासारखीं आहेत. पुस्तकाचा उपयोग करणारांना त्याचा फायदा होईलच; आणि त्यांचे द्वारां देशाचाहि फायदा होईल, अशीच अपेक्षा आहे.

## छोट्या उद्योगधंद्यांस मदत करण्यासाठी चार नमुना विभागांची स्थापना

ग्राहकांना आवडतील असे सुधारलेले नमुने तयार करण्यांत छोट्या उत्पादकांस मार्गदर्शन करण्यासाठी मुंबई, कलकत्ता, दिल्ली व मद्रास शहरीं नमुना विभाग उघडण्यांत येणार आहेत. हे विभाग या चार शहरांतील रिजनल स्मॉल इंडस्ट्रीज सर्व्हिस इन्स्टिटयूटसना जोडून असतील. मध्यवर्ती व्यापार व उद्योगधंदे खात्यानें स्थापिलेल्या या संस्था छोट्या उद्योगधंद्यांस तांत्रिक मार्गदर्शन व सल्ला देत असतात. हे नमुना विभाग प्रथमतः ग्राहकोपयोगी मालाच्या उद्योगधंद्यांकडे लक्ष देतील. यांत फर्निचर, लांकूडकाम, कटलरी, घरगुती वापराचीं भांडीं, कांचेचा माल, इ. चा समावेश होतो. हे विभाग पूर्णावस्थेस पोंचल्यावर ते संपूर्णतः भारतीयांकडून चालविले जातील आणि छोट्या उद्योगधंद्यांस सुधारलेल्या दर्जाचे नमुने तयार करण्याच्या कामांत साह्य देतील.

## शास्त्रें शिकविण्यासाठी इंग्रजीच पाहिजे

भारतामधील शिक्षणपद्धतीविषयीं गेल्या कांहीं वर्षांत बरीच वादग्रस्त चर्चा चालली आहे. ह्या चर्चेंत शिक्षणाचें माध्यम काय असावें ह्या महत्त्वाच्या प्रश्नावरहि पुष्कळच मतप्रदर्शन झालेलें आहे. भारत मागासलेला असल्यामुळें शास्त्रीय विषयांच्या शिक्षणाला साहजिकच अधिक महत्त्व आलेलें आहे. निदान शास्त्रीय विषयांचें अध्यापन करतांना तरी इंग्रजी माध्यमच वापरलें जावें, असें मत भारताचे प्रमुख अणुशक्तितज्ज्ञ डॉ. भाभा ह्यांनीं व्यक्त केलें आहे. 'टाइम्स ऑफ सीलोन' ह्या वृत्तपत्राच्या प्रतिनिधींशीं बोलतांना ते म्हणाले कीं, शास्त्रीय विषय म्हणजे कांहीं वाङ्मय नव्हे. शास्त्रीय विषयांची स्वतःची अशी एक विशिष्ट भाषा असते. भारत अगर सीलोन ह्या देशांनीं शास्त्रीय विषय शिकविण्यासाठी इंग्रजीशिवाय दुसरी एखादी भाषा स्वीकारण्याचें कारण नाहीं. सध्यां भारतांत शिक्षणाच्या माध्यमांत बदल करण्याच्या पुष्कळच सूचना करण्यांत येत आहेत. पण त्यांत फारसा अर्थ नाहीं. इंग्रजी भाषेंत शास्त्रीय विषयांवरील हजारों पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत येत असतात. ह्या पुस्तकांतील अद्यावत् ज्ञानाशीं परिचय करून घेण्यासाठी भारतामधील शास्त्रीय विषयाच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकण्याखेरीज गत्यंतरच नाहीं. हीच गोष्ट व्यवहार्य आहे. कारण, इंग्रजी पुस्तकांचीं देशी भाषांत एकसारखी भाषांतरें करणें अशक्यच आहे. शास्त्रीय विषयांच्या अध्यापनासाठी देशी भाषा वापरण्याची सूचना भारत सरकारनें २० वर्षें पुढें ढकललेली आहे. २० वर्षांनंतर ह्या प्रश्नाचा फेरविचार करण्यांत यावयाचा आहे. म्हणजे, व्यवहारतः शास्त्रीय विषयाचें भारतामधील माध्यम इंग्रजी हेंच कायमचें राहील, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## फळें टिकविण्याचा सहकारी प्रयत्न

सुरत जिल्ह्यांतील पारडी तालुक्यांत आंब्यासारखीं फळें डबाबंद करून टिकविण्यासाठी एक कारखाना काढण्यांत येणार आहे. सदर्न गुजरात को-ऑपरेटिव्ह फ्रूट अँड व्हेजिटेबल ग्रोअर्स असोसिएशन लि. ह्या संस्थेतर्फें हा प्रयत्न करण्यांत येणार आहे. मुख्यतः आंबा हें फळ हवाबंद डब्यांत भरण्यांत येईल. कारखान्याची जी योजना मुक्रर करण्यांत आली आहे तीप्रमाणें जमीन आणि इमारत ह्यांच्यासाठी १८,००० रुपये खर्च येणार आहे. त्याशिवाय कारखान्यासाठी जीं इतर साधनें व यंत्रसामुग्री लागणार आहे, त्यावर २०,००० रुपये खर्च होणार आहेत. बाकीच्या खर्चासाठी ५,००० रुपयांची तरतूद करावी लागणार आहे. ह्या असोसिएशनचे सुमारें २,००० सभासद आहेत. त्यांपैकी बहुतेक पारडी तालुक्यांत फळबागांचा व्यवसाय करणारे आहेत. आंब्याच्या वार्षिक हंगामांत ह्या संघटनेतर्फें किमान पांच लाख करंड्या विक्रीसाठी पाठविण्यांत येतात. असोसिएशनजवळ स्वतःच्या मालकीचें बरेंच भांडवल असून त्याला फळें टिकविण्याच्या बाबतींत तज्ज्ञांचा सल्लाहि मिळण्यासारखा आहे. पारडी व बलसाड ह्या सुरत जिल्ह्यांतील तालुक्यांत मुंबई राज्यांतील आंब्याच्या एकूण लागवडीपैकी १७ टक्के लागवड होते. ह्या भागांत दरसाल सुमारें ५½ लाख आंब्यांची निर्मिति होते, असा अंदाज आहे. असोसिएशन आंबे टिकविण्याविषयीं संशोधन करण्यासाठी एक केंद्र उघडणार आहे. आंब्याच्या बागवानांना केंद्राकडून उपयुक्त सल्ला मिळेल. डबाबंद आंबे तयार करण्याच्या ह्या प्रयत्नामुळें बागायतदारांचा चांगला फायदा होईल.

## स्टेट बँकेचा वाढता व्याप

### " खासगी क्षेत्रासाठी खासगी बँका हव्यातच ",

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या दिल्ली विभागाचें उद्‌घाटन अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी यांनीं दि. २ रोजीं केलें. इंपीरिअल बँकेचें राष्ट्रीयीकरण केलें, म्हणून बाकीच्या सर्व बँकांचेंहि राष्ट्रीयीकरण केलें जाईल, असें मानणें चुकीचें असल्याचें त्यांनीं सांगितलें. बिन सरकारी उद्योगधंद्यांना भांडवल पुरविण्यासाठी बिन-सरकारी बँकाहि हव्यातच; तें भांडवल पुरविण्याची जबाबदारी सरकार कसें घेऊं शकणार ? अर्थात्, त्यांचेवरील नियंत्रणें मात्र वाढत जाणार. बँकांवरील सध्यांचीं बंधनें जाचक आहेत, असें अर्थमंत्र्यांना वाटत नाहीं. स्टेट बँकेला पांच मोठ्या बिनसरकारी बँकांची स्पर्धा होते, ही स्वागतार्हच गोष्ट आहे; कारण त्याखेरीज कार्यक्षमता टिकणार नाहीं. शेतीला कर्जपुरवठा करण्याची जबाबदारी सध्यां रिझर्व्ह बँकेवर आहे; ती जबाबदारी कांहीं प्रमाणांत स्टेट बँकेवर टाकण्याचा सरकारचा विचार आहे. लहान आकाराच्या उद्योगधंद्यांना मदत करणाऱ्या प्रायोगिक योजनेस स्थायी स्वरूप लवकरच प्राप्त होईल, अशी आशा अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केली.

### शाखा, ठेवी, कर्जें, ह्यांत वाढ

स्टेट बँकेवर, तिच्या स्थापनेच्या कायद्याप्रमाणें, जुलै १९६० पूर्वी, पंचवार्षिक काळांत ४०० शाखा चालविण्याची जबाबदारी टाकलेली आहे. जुलै, १९५५ मध्यें २३९ शाखा अस्तित्वांत होत्या. बँकेनें आतांपर्यंत १५७ नव्या शाखा उघडल्या आहेत. शेती, लहान आकाराचे उद्योगधंदे व हुंडणावळ ह्या क्षेत्रांतील बँकेचें काम वाढत चाललें आहे. ३० जून, १९५५ रोजीं बँकेकडे २११ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या, त्या ३० जून, १९५७ रोजीं ३१६ कोटी रुपयांवर गेल्या. आतां त्या ३६५ कोटी रुपयांपर्यंत पोंचल्या आहेत. ३० जून, १९५५ रोजीं बँकेनें ११७ कोटी रुपयांचीं कर्जें दिलेलीं होतीं, आतां बँकेनें दिलेलीं कर्जें १७४ कोटी रुपये झालीं आहे. लहान उद्योगधंद्यांसाठी सुरू केलेल्या पायलट योजनेखाली १४१ उद्योगधंद्यांना ६२ लक्ष रुपयांचीं कर्जें मंजूर करण्यांत आलेलीं आहेत; शेतीच्या व्यवसायालाहि अधिक कर्जपुरवठा केला जात आहे.

## देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

### १९ लक्ष, ३० हजार रु. नफा; ६% करमाफ डिव्हिडंड

वरील बँकेस ३१ डिसेंबर, १९५७ अखेर संपलेल्या वर्षी १,६०,००० रु. ची नोकरवर्गाच्या बोनससाठी तरतूद करून व शिलकी नफा २,१३,१४१ रु. धरून, एकूण १९,३०,३२० रु. नफा झाला. ३० जून, १९५७ अखेरच्या सहामाहीसाठी करमाफ ५% डिव्हिडंड देण्यास १,२५,००० रु. लागले होते. आतां रिझर्व्ह फंडांत ५,००,००० रु. घालून, इनव्हेस्टमेंट रिझर्व्हकडे ५०,००० रु. वर्ग करून (रिझर्व्ह फंडांची रक्कम आतां ४०,००,००० रु. होईल), करासाठी ८,००,००० रु. ची तरतूद करून ३१ डिसेंबर, १९५७ अखेरच्या सहामाहीसाठी ७% डिव्हिडंड देण्यासाठी (म्हणजे सबंध वर्षाचें ६% डिव्हिडंड वाटण्यासाठी १,७५,००० रुपयांचा विनियोग करावा, अशी बोर्डाची शिफारस आहे. २,८०,३२० रु. शिलकी नफा पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढण्यांत येईल.

### प्रगतीचे तुलनात्मक आंकडे

| | १९५७ | १९५६ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| रिझर्व्ह फंड | ४०,००,००० | ३४,५०,००० |
| एकूण ठेवी | २३,११,००,००० | १९,३५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | २८,००,००,००० | २४,५०,००,००० |
| एकूण खातीं | १,३२,००० | १,२०,००० |
| शाखांची संख्या | ६९ | ६३ |
| डिव्हिडंड | ६% | ६% |

**अमेरिकन डॉक्टरची आत्महत्या**—दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनीच्या सरकारमधील प्रमुख लोकांची गुन्हेगार म्हणून चौकशी होऊन त्यांना शिक्षा देण्यांत आल्या. ह्या खटल्यांच्या कामीं सल्ला देणारे अमेरिकन मानसशास्त्रज्ञ डॉ. डगलस केली ह्यांनीं नुकतीच आत्महत्या केली. जर्मनीचा नाझी पुढारी हरमन गोअरिंग ह्यानें जें विष खाऊन आत्महत्या केली, तेंच विष डॉक्टर केली ह्यांनीं घेतलें. विष त्यांनीं जर्मनीहून बरोबर आणलें होतें !

### भारताची आंतरराष्ट्रीय येण्या-देण्याची परिस्थिति

(देशवार आढावा : आंकडे कोटी रुपयांचे)

| | ३०-६-१९४८ | | | ३१-१२-१९५५ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | देणें | येणें | निव्वळ देणें-येणें | देणें | येणें | निव्वळ देणें-येणें |
| ग्रेट ब्रिटन ... | २९८·२ | १५९१·२ | + १२९३·० | ४४३·६ | ८५२·१ | + ४०८·५ |
| अमेरिकन ... | २०·२ | १५·३ | – ४·९ | १४०·६ | ३५·९ | – १०४·७ |
| पाकिस्तान ... | ६६.८ | ३२२·५ | + २२५·७ | ५०·७ | ३२०·२ | + २६९·५ |
| बर्मा ... | ८·८ | ५४·२ | + ४५·४ | ५·५ | ३·९ | – १·७ |
| जागतिक बँक व फंड ... | १४·९ | ११·८ | – ३·२ | २९·३ | १९·३ | – १०·० |
| इतर ... | ९५·३ | १३·७ | – ८१·६ | ९६·६ | २०·४ | – ७६·२ |
| एकूण ... | ५०४·२ | २००८·७ | + १५०४·५ | ७६६·३ | १२५१·८ | + ४८५·५ |

## GOVT. DIPLOMA IN CO-OPERATION AND ACCOUNTANCY

**October 1957, Examination Results**

### Passed in the Whole Examination

(1st Class: Nil; Second Class: Nil).

### Pass Class

M. D. Sompura, P. P. Trivedi, J. Y. Dharmadhikary, S. A. Ghorpade, V. B. Gokhale, B. A. Patwegar, G. V. Sheelwant, P. G. Swadi, M. M. Bhave, V. S. Gandhe, B. V. Kumbhare, B. T. Rana, R. T. Rana, Shaikh Abdul Rahim, R. R. Upadhye, V. G. Walvekar.

### Passed in Co-operation Group Only

R. S. Bhalerao, N. V. Deshpande, M. V. Gadgil, Bhaskar Gupta, D. R. Jedhe, S. M. Jhala, J. S. Nabar, S. N. Parasnis, M. S. Patel, S. K. Pundlik, V. H. Tanksale.

### Passed in Accountancy Group Only

N. C. Parikh.

### Passed in Banking Paper Only

V. S. Athane, R. M. Deshpande, L. K. Gad, V. G. Gupte, A. R. Kanade, S. P. Khadilkar, B. H. Khakhr, B. B. Khole, P. V. Kulkarni, B. A. Pathan, N. F. Patel, R. C. Pathak, M. N. Patel, O. A. Shah, N. A. Desurkar, B. N. Pimpale.

### Exemptions

The following candidates have also secured exemptions as detailed below:—

| Name | Paper No. | |
|---|---|---|
| R. M. Deshpande | I, II & III | (Copn.) |
| L. K. Gad | II & III | (Copn.) |
| V. G. Gupte | II & III | (Copn.) |
| P. V. Kapse | I & III | (Copn.) |
| B. H. Khakhar | II & III | (Copn.) |
| L. K. Narappanavar | II & III | (Copn.) |
| R. C. Pathak | I & III | (Copn.) |
| N. F. Patel | I, II & III | (Copn.) |
| M. N. Patel | II & III | (Copn.) |
| Indumati D. Phadke | III & IV | (Copn.) |
| O. A. Shah | II & III | (Copn.) |
| Ibrahim Abdul Rahim | V & VII | (Accts.) |
| Abdul Raheman Rahemtulla Shaikh | V & VI | (Accts.) |
| J. K. Vasavada | V & VII | (Accts.) |

Poona
26-12-1957

C. K. PATEL
Registar, C. S. & Chairman, C. & A. Diploma Board.

**फ्रेंच सरकारच्या शिष्यवृत्त्या**—पदवीनंतरचा अभ्यासक्रम अगर संशोधन करण्यासाठी फ्रेंच सरकारनें भारतामधील विद्यार्थ्यांसाठी ११ शिष्यवृत्त्या जाहीर केल्या आहेत. प्रत्येक शिष्यवृत्ति दरमहा ३४० रुपयांची आहे. विद्यार्थ्यांना बोटीचें दुसऱ्या वर्गाचें दुहेरी भाडें मिळेल. त्याशिवाय फी माफ असेल व वैद्यकीय मदत मोफत मिळेल.

**भारत-नेपाळ करार**—नेपाळच्या हिमालयांतील प्रदेशांत रस्ते बांधण्यासंबंधीं भारत व नेपाळ ह्यांच्या दरम्यान करार झाला आहे. निरनिराळ्या प्रकारचे ९०० मैल लांबीचे रस्ते बांधण्यांत येणार आहेत, व त्यासाठी सुमारें ३.४३ कोटी रुपये खर्च येणार आहे.

### अन्नधान्यांच्या तारणावरील बँक-कर्जें

(आकडे लक्ष रुपयांचे)

| १९५७ | भाताच्या तारणावरील कर्जें | गहूं व इतर अन्नधान्यें ह्यांचे तारणावरील कर्जें |
|---|---|---|
| मार्च | २२,७९ | ७,०१ |
| एप्रिल | २२,१२ | ९,६३ |
| मे | २१,४८ | १८,८० |
| जून | १६,८९ | २०,८० |
| जुलै | ११,०९ | १६,३५ |
| ऑगस्ट | ६,४४ | १२,४२ |

### चलनाचा पुरवठा

(कोटी रु.)

| शेवटचा शुक्रवार | प्रसारांतील नोटा | काढलेल्या नोटा | चलनाचा एकूण पुरवठा |
|---|---|---|---|
| १९५१ | ११४१.०९ | ११६०.३१ | १८२२.०० |
| १९५२ | १०९२.१२ | १११२.९० | १७२३.०० |
| १९५३ | ११२५.५२ | ११३५.८९ | १७१४.९० |
| १९५४ | १२००.४९ | १२२६.५० | १८४८.८९ |
| १९५५ | १३६१.९७ | १३७४.०१ | २०४७.७५ |
| १९५६ | १४६६.०७ | १४५७.२१ | २१७८.३० |
| १९५७ मार्च | १५२६.०९ | १५३७.८६ | २३१२.८८ |
| जून | १५४२.१७ | १५८१.६७ | २३४२.०६ |

### रिझर्व्ह बँकेजवळील सोन्याचें व विदेशी रोख्यांचें तारण

(आकडे कोटी रुपयांचे)

| शेवटचा शुक्रवार | सोनें | विदेशी रोखे | एकूण |
|---|---|---|---|
| १९५१ | ४०.०२ | ७८१.०९ | ८२१.११ |
| १९५२ | ४०.०२ | ७०५.४९ | ७४५.५१ |
| १९५३ | ४०.०२ | ७२२.६१ | ७६२.६३ |
| १९५४ | ४०.०२ | ७३०.७९ | ७७०.८१ |
| १९५५ | ४०.०२ | ७३५.१७ | ७७५.१९ |
| १९५६ | ११७.७६* | ५२९.९१ | ६४७.६७ |
| १९५७ मार्च | ११७.७६* | ५२६.८३ | ६४४.५९ |
| जून | ११७.७६* | ४५३.३४ | ५७१.१० |

* पूर्वीइतकेंच सोनें, पण ६२ रु. ८ आ. ह्या नव्या दरानें दाखविलेलें.

### नवीं आयुर्विमा पत्रें

लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियानें २५ नोव्हेंबर, १९५७ पर्यंत एकूण १९२.३० कोटी रुपयांचीं नवीं आयुर्विमा पत्रें दिलीं असून, त्यांची विभागनिहाय वर्गवारी पुढीलप्रमाणें आहे:—उत्तर विभाग-२५.३० कोटी रुपये. मध्य विभाग-२५.६१ कोटी रुपये. पूर्व विभाग-४२.७८ कोटी रुपये. दक्षिण विभाग-५४.२२ कोटी रुपये आणि पश्चिम विभाग-४४.३९ कोटी रुपये.

## पेट्रोल व तज्जनित वस्तूंच्या किंमती

भारतांत पेट्रोल व त्यापासून तयार करण्यांत आलेल्या वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या चार प्रमुख कंपन्या आहेत. ह्या कंपन्या आणि भारत सरकार ह्यांच्या दरम्यान सध्यां वाटाघाटी चालू आहेत. पेट्रोल व तज्जनित वस्तु ह्यांच्या किंमती वाजवी पातळीवर आणण्यासाठी वाटाघाटी करण्यांत येत आहेत. ह्यासंबंधीं भारत सरकारनें लोकसभेला व देशांतील लोकांना कांहीं आश्वासनें दिलेलीं आहेत. ह्या कंपन्या इतर देशांत ज्या किंमतींना वरील वस्तूंची विक्री करतात त्या किंमतींच्या पातळीवर तरी निदान भारतामधील किंमती आणण्यांत येतील, असें आश्वासन सरकारतर्फे देण्यांत आलेलें आहे. परंतु स्थिति अशी आहे कीं, भारतामध्यें तेल शुद्ध करण्याचे कारखाने निघाल्यावर सुद्धां ह्या वस्तूंच्या किंमती कमी होण्याचें तर बाजूलाच राहिलें; उलट त्या वाढलेल्या आहेत असें दिसून येतें. तेलाच्या शुद्धीचे कारखाने काढल्यानंतर किंमती खालीं येतील ह्या अपेक्षाचा भंग झालेला आहे. ज्या देशांत तेल शुद्ध करण्याचे कारखाने नाहींत आणि म्हणून ज्या देशांत पेट्रोलची आयातच सरळ करण्यांत येते, अशा देशांतील किंमती सुद्धां भारतामधील किंमतींच्या मानानें कमी आहेत. म्हणून सध्यांच्या वाटाघाटी यशस्वी होऊन किंमती वाजवी पातळीवर आणण्यांत येतील अशी आशा व्यक्त करण्यांत येत आहे. भारत सरकारला ह्या कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण करावें कीं काय, ह्याचा विचार पुढेंमागें करावा लागणार आहे. सध्यांच अशा तऱ्हेचा कांहींहि विचार चालू नाहीं. पण ह्या कंपन्यांची तेल वांटप करण्याची पद्धति व त्यांची एकंदर आर्थिक परिस्थिति ह्यांचा सरकारतर्फे कसून अभ्यास करण्यांत येत आहे.

## हैड्रोजन बाँबचे स्फोट व मानवी आरोग्य

ब्रिटनमधील सुप्रसिद्ध वैद्यकीय नियतकालिक 'लान्सेट'नें आपल्या ताज्या अंकांत हैड्रोजन बाँबच्या स्फोटामुळें मानवी आरोग्याला कितपत धोका पोचतो ह्याविषयीं चर्चा केली आहे. अणुशक्तीच्या तज्ज्ञांनीं प्रथम असें मत व्यक्त केलें होतें कीं, अणुस्फोटामुळें दूषित धूलिकणांचा पृथ्वीवर जो वर्षाव होतो तो फारसा धोकादायक नसतो. पण आतां शास्त्रज्ञांना असें आढळून आलें आहे कीं, हे धूलिकण मानवी आयुष्याला फारच घातक असतात, इतकेंच नव्हे, तर स्फोटानंतर धूलिकणांचा प्रसार ज्या मार्गानें होतो त्याच मार्गाच्या कक्षेंत ग्रेट ब्रिटन नेमकें येत आहे. स्फोटानंतर जे विषारी धूलिकण अंतराळांत पसरतात ते २०,००० फुटापेक्षा अधिक वर जातात व नंतर सर्व पृथ्वीवर सारखेच पडतात असें मानण्यांत येत असे. पण आतां अमेरिकन शास्त्रज्ञांनीं स्फोटानंतरच्या वायुप्रवाहांचा जो अभ्यास केला आहे त्यावरून असें दिसतें कीं, विषारी वायुप्रवाह मुख्यतः उत्तर अमेरिका, बहुतेक सर्व युरोप आणि सैबेरिआ ह्या भूप्रदेशावरून जातात. अर्थातच ह्या भागांत विषारी धूलिकण अधिक प्रमाणांत पडतात आणि तेथील वनस्पति व दूध आरोग्याला बाधक करून टाकतात. अमेरिकेच्या ॲटॉमिक एनर्जी कमिशनला सल्ला देणारें १२ शास्त्रज्ञांचें एक शिष्टमंडळ आहे. ह्या मंडळानें अशी माहिती जाहीर केली आहे कीं, हैड्रोजन बाँबच्या स्फोटानंतर जें विषारी आयोडिन हवेंत पसरतें तें माणसांच्या व प्राण्यांच्या गळग्रंथींमध्यें प्रवेश करतें व विकृति उत्पन्न करतें. त्याशिवाय स्ट्रॉंटिअम हें विषारी द्रव्य पसरून मानवी शरिरांत घर करतें. त्यामुळें रक्ताचा व हाडाचा कॅन्सर होण्याचा संभव बऱ्याच प्रमाणांत वाढतो.

## बँक ऑफ महाराष्ट्राच्या ठेवींत दीड कोटींची वाढ

### ६% डिव्हिडंड कायम

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड ला १९५७ सालीं सर्व खर्च भागून, नोकरवर्गास बोनस देण्यासाठी रुपये ७०,००० ची तरतूद करून (मागील वर्षी ही तरतूद रु. ६०,००० होती) व इतर आवश्यक व नित्याच्या तरतुदी करून (ऑडिट होण्याचे अगोदर) निव्वळ नफा रु. ४,६९,००० इतका झाला. मागील वर्षीचे नफ्यापेक्षा ही रक्कम रु. ६८,००० नें अधिक आहे. १९५७ सालांतील पुढें ओढलेली नफ्याची रक्कम रु. ३२,००० यांत मिळविली असतां एकूण रु. ५,०१,००० इतका नफा वांटणी करण्यासाठी उपलब्ध होतो. त्याची विभागणी पुढीलप्रमाणें करण्याचें संचालकांनीं योजिलें आहे.

| | | रुपये |
|---|---|---|
| इन्कमटॅक्स व सुपरटॅक्ससाठी तरतूद | ... | २,१०,०००–०–० |
| रिझर्व्ह फंडांत जमा करणें | ... | १,५०,०००–०–० |
| शेअर्सवर ६ टक्के करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी | ... | १,०५,०००–०–० |
| ही रक्कम पुढील वर्षीच्या नफ्यांत | ... | ३६,०००–०–० |
| | | ५,०१,०००–०–० |

ठेवींत या वर्षी जवळ जवळ दीड कोटी रुपयांची वाढ होऊन त्यांची रक्कम ६,२६,००,००० वरून ७,८५,००,००० वर गेली व एकूण खेळतें भांडवल रुपये ७,३०,००,००० वरून रुपये ९,२५,००,००० च्या वर गेलें. संकल्पित नफा वांटणीनंतर बँकेची एकूण गंगाजळी ११,५०,००० रु. होईल.

## बेळगांव बँकेस १,३६,००० रु. नफा

### डिव्हिडंडचा दर ७½%

दि बेळगांव बँक लि. ला १९५७ सालीं १,३५,७२५ रु. निव्वळ नफा झाला आहे. स्टाफला दोन महिन्यांचा बोनस व आवश्यक त्या तरतुदी करून हा नफा झालेला आहे. रिझर्व्ह फंडाकडे नियमानें जरूर त्यापेक्षाहि अधिक रक्कम वर्ग करण्यांत आली आहे. भागदारांना ५% डिव्हिडंड + २½% बोनस, अशी ७½% दरानें नफा–वाटणी डायरेक्टरांनीं सुचविली आहे.

१९५६ मध्यें बँकेस, स्टाफला एक महिन्याचा बोनस देऊन, ८०,०६० रु. नफा झाला होता, व भागदारांना ५% डिव्हिडंड + १¼% बोनस, अशी ६¼% दरानें नफा–वाटणी मिळाली होती. म्हणजे, आतां नफावाटणीच्या दरांत १¼% वाढ झालेली आहे. नफ्याची रक्कम १९५६ चे मानानें दीडपटीपेक्षाहि अधिक आहे.


श्री. वा. काळे ह्यांचीं

कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें

१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,

३ तुमचें स्थान कोणतें ?

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.



# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवी वरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | व्याजाचा दर |
|---|---|
| १ वर्ष | २½ टक्के |
| २ वर्षें | २¾ टक्के |
| ३ वर्षें | ३ टक्के |
| ५ वर्षें | ३½ टक्के |
| १० वर्षें | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१–७–५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स



# बँक ऑफ पूना, लिमिटेड

—शेड्यूल्ड बँक—

व्याजाच्या दरांत १% चा फरक म्हणजे १०,००० रुपयांवर १०० रु. होतात. हे शंभर रुपये तुम्हांला आणखी ३ ते ४ रुपये मिळवून देतात.

आमच्या सेव्हिंग्ज बँक ठेवी मागणीसरशीं परत केल्या जातात. पूर्वसूचनेची आवश्यकता नाहीं.

२½% दरानें व्याज दिलें जातें.

बँकेंत तुम्ही तासनतास वाया घालवूं इच्छित नाहीं.

दक्षतेच्या कारभारासाठी आणि तुमच्या गुंतवणुकीवर अधिक व्याज मिळविण्यासाठी बँकांच्या खालील कचेऱ्यांत चौकशी करा :—

(१) ४५५, रविवार पेठ, पुणें २.
(२) ५४, डे. जि. कॉलनी, पुणें ४.
(३) ३६१, सदाशिव पेठ, पुणें २.
(४) वखार भाग, सांगली.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.